# गंध तुझ्या प्रेमाचा

नबीसाब शेख



Scanned by TapScanner

**गंध तुझ्या प्रेमाचा**/Gandh Tuzya Premacha


(Marathi Poems)

© कवी : नबीसाब मुजमीलसाब शेख
(सर्व हक्क) मंगरुळ, ता.जळकोट, जि.लातूर
मो.९५९५७९२२२३

प्रकाशक : मिलिंद काटे
अनुराधा प्रकाशन
कार्या.: क्वालिटी कॉम्प्युटर्स, पैठण,
निवास : खंडोबा नगर, शेवगांव, जि.नगर.
मो. ९७६५६५१२०१
मो. ९४२३४५५२७२

मुद्रक : क्वालिटी कॉम्प्युटर्स,
जुना नगर रोड, पैठण, जि.औरंगाबाद.

प्रकाशन दिनांक : २६ जून २०१३ (सामाजिक न्याय दिन)
मुल्य : ३० रु.



तमाम प्रेमावर जगणाऱ्या व
जगण्यावर प्रेम करणाऱ्या
बेधुंद तरुण तरुणीस
हे युवा हृदयाचं स्पंदन
मन:पूर्वक अर्पण... !

# मन:पुर्वक आभार !

श्री.विलास सिंदगीकर
श्री.अशोक ज.कांबळे
प्रा.श्री.रा.ना.पस्तापूरे
प्रा.श्री.पी.एस.कांबळे,
प्रा.श्री.सुनिल चौरे,
श्री.तोलसरवाड हरिदास,
श्री.गणेश हिंगमिरे
श्री.अक्रम दावल पटेल
श्री.शेख जब्बार
श्री.मुजमीलसाब
प्रा.श्री.मधुकर जायभाये,
श्री.जितेंद्र रामराव पाटील
सरदार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था



Scanned by TapScanner

## दोन शब्द...

या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने मन मोहक होऊन तरूणाईच्या बेधुंद अवस्थेत उधाण वाऱ्यावर थुईथुई नाचत आहे. डौलत आहे. तमाम महाराष्ट्रातील युवक-युवतींच्या मनात 'गंध तुझ्या प्रेमाचा' अखंड दरवळत राहो, अशी मनपुर्वक प्रार्थना!

प्रेम म्हणजे ईश्वराला पडलेलं एक सुंदर स्वप्न.. आणि प्रेमात सगळ्यांनाच स्वप्न पडतात. या माझ्या कवितासंग्रहातून एखादा प्रेमी आपल्या प्रेयसीवर व प्रेयसी प्रियकरावर कसे जिवापाड प्रेम करतात, एकमेकांसाठी झुरतात, प्रेमात कसे गुंतत असतात, रडतात, रडवतात सुध्दा. या मानसिक व भावनिक आंदोलनाच्या काळात मनाची होणारी तळमळ, अगतिकता व एकमेकांना भेटण्यासाठी असलेली आतुरता कवितेच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. प्रेमासारखा नाजूक विषय हाताळताना वाटायचे जास्त ताणणार तर नाही ना ! धागा तुटणार तर नाही ना ! दोन धगधगत्या हृदयांना जोडणारा धागा म्हणजे प्रेम ! थोड्या थोड्या गोष्टीवर फिसकतं, खटकतं ते प्रेम. या काव्यसंग्रहाचे लेखन करताना मी अनेक प्रसंग रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रेयसी संकटात असताना मनाला वाटलेल्या भावना, मनाला झालेले दु:ख आजाराचा प्रसंग असताना, वादाचा प्रसंग असताना, मनातील इच्छेचा प्रसंग असताना, काय पडसाद उमटू शकतात हे कवितेच्या माध्यमातून व्यक्त केले आहे.अखेर कवी हा कल्पनेचा पुजारी असतो, असं म्हटलं जातं.

या काव्यसंग्रहाचे लेखन करताना सुप्रसिध्द कवी अशोक ज.कांबळे यांनी प्रेरणा दिली व आदरणीय प्रसिध्द कथाकार विलास सिंदगीकर यांनी मन भरून कौतूक केले. माझ्या मुल्य शिक्षण प्रकल्पातील अधिकारी, सहकारी व मित्र-मैत्रिणी यांच्या

प्रेम व सहकार्यामुळे हा प्रेमानं ओतप्रोत भरलेला काव्यसंग्रह मी पूर्ण करू शकलो. मुल्यशिक्षण प्रकल्प ज्यांच्या धडपडीमुळं या लातूर जिल्ह्यात आला त्याचे सर्वेसर्वा मा.श्री.भिमाशंकर बोळेगावे सर यांच्या प्रेमामुळे हे कुटूंब बहरुन आलं.

प्रा.सुनिल चौरे जेव्हा ट्रेनिंगमध्ये कविता गायन करायचे त्यावेळी सुध्दा प्रेमभावना अनावर व्हायच्या. ते म्हणतात,

गुंतले गुंतले हृदय तुझ्या हृदयाशी
लागले लागले वेड तुझे या जीवाशी

पराकोटीची प्रेमभावना आणि प्रेमाची नशा त्यांच्या कवितेतून प्रत्ययास आली.

शेवटी माझे लहान बंधू शेख जब्बार यांनी पाठीवर प्रेमाची थाप देऊन पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. अनुराधा प्रकाशनचे प्रकाशक मिलिंद काटे यांनी या काव्यसंग्रह प्रकाशनाची जबाबदारी सांभाळून अतिशय कमी वेळेत त्यांनी ही सुंदर कलाकृती तयार करुन दिली. त्यांच्या आभाराचे भार हृदयात प्रेमाचा सुगंध बनून दरवळत राहिल. शेवटी तमाम तरुण तरुणींच्या हाती गंध तुझ्या प्रेमाचा देऊन तुर्तास थांबतो.

**नबीसाब मुजमीलसाब शेख**
मंगरुळ, ता.जळकोट, जि.लातूर
मो.९५९५७९२२२३

# प्रेत

माझं ते प्रेत
नशीबवान असावं !
पुरताना मला
तुझ्या हाताचा स्पर्श
त्या मातीला लाभावं !
जगताना बघ मी
तुझ्यावर किती मरावं !
मेल्यावर का होईना
हाताला हात लागावं !
मग त्या स्पर्शाने
मसणवाटा ही
बगीचा वाटावं !
रडणाऱ्या सगळयांना
गोड जेवणाचं आमंत्रण असावं !
खरचं असे वाटावं !
एक योग मिळावं !
गंध तुझ्या प्रितीचा
दरवळत रहावं !

# माझी ती

मी आनंदात असताना
ती दूरुन तरी पहावी
बोलली नाही तरी चालेल
किमान गालात तरी हसावी...

मी दुःखात असताना
ती जवळ तरी यावी
रडली नाही तरी चालेल
किमान अश्रू तरी पुसावी...

सहज दिसलो असताना
बाजूने तरी चालावी
चालली नाही तरी चालेल
मागे फिरून तरी पहावी...



Scanned by TapScanner

# स्वप्न सुंदरी

ये स्वप्न सुंदरी
ओळख तुझी देशील का?
जीवनात नाही पण
स्वप्नात तरी येशील का?

ये स्वप्न सुंदरी
बागेत केव्हा तरी जाशील का?
एकटीच आहेस म्हणून
सोबत तरी नेशील का?

ये स्वप्न सुंदरी
थोडा वेळ तुला मिळेल का?
प्रेम नाही किमान
मैत्री तरी करशील का?



Scanned by TapScanner

# चांदणं

तुझं हलत डुलत चालणं
तुझं हसत हसत बोलणं
वाऱ्यानं केसाचं भुरभूरणं
म्हणजे माझ्या हृदयात चांदणं निघणं !

तुझं ते ठणकावून बोलणं
मध्येच इकडे तिकडे पहाणं
नजर पडताच हळूच लाजणं
म्हणजे माझ्या हृदयात चांदणं निघणं !

तुझ्या पैंजणीचं झुणझुणनं
तुझ्या साडीच चकाकणं
नाकातल्या नथीचं लुकलुकणं
म्हणजे माझ्या हृदयात चांदणं निघणं !



Scanned by TapScanner

# तर सांग प्रिये

मला स्वतःलाच काही
कळत नसेल
तुझा नाजूक असा चेहरा
डोळ्यामोरून माझ्या
हलतचं नसेल
तर सांग प्रिये...!
मी काय करु ?

सतत तुझी
आठवण येत असेल
ओठांवर तुझेच
नाव असेल
तुझ्याशिवाय काही
आठवतच नसेल
तर सांग प्रिये...!
मी काय करु ?

प्रत्येक दिवशी आठवण
तुझी येत असेल
तुझ्याशिवाय जीवन
जगणे कठीण असेल
स्वप्नात सुध्दा
तुझीच प्रतिमा येतअसेल
तर सांग प्रिये ...!
मी काय करु ?

# वाट

जीवनाच्या या वाटेवरती
दुःखे किती फार,
रुतला जरी काटा तुला
माझे अश्रू आरपार.

असा कसा फरक पडला
प्रेमामध्ये या दोघांच्या,
धक्का मज पायी लागला
डोळ्यांत अश्रू का न दिसला.

पाहतो तुज चोहीकडे
प्रेमात मी वेड्यासारखा,
असून मी मरणाच्या वाटेला
तूज काही फरक न पडता.

हृदयामध्ये सुध्दा
रक्तासाठी वाट आहे,
माणसाच्या या दुनियेत
जगण्यासाठी आडवाट आहे.



Scanned by TapScanner

# प्रेम

तुझी आठवण आली
हृदयाला बेचैन करुन गेली,
म्हटलं प्रेमपत्राने कळवू
त्यासाठी चारोळी नाही केली.

मनाला रहावेनासं झालं
वाटलं किमान फूलं तरी पाठवू,
हिंमत नाही म्हणूनी
किती फूले तरी साठवू.

शेवटी स्वतःच मी निघालो
म्हटलं प्रेम तरी प्रकट करु,
तेथे आलो फक्त पाहातच राहिलो
चहाचा घोट घेऊन बघतच राहिलो.

तसाच मी घरी आलो
प्रेम तर मिळालचं नाही,
इकडून तिकडे फेऱ्या मारण्यात
खूप खूप बेजार मात्र झालो.

# मी नंतर फोन करते

विषयात आपल्या प्रेमाच्या
मन असे कसे हे रमते
मध्येच आले कुणी तर
तू लगेच मला म्हणते,
मी नंतर फोन करते...!

दोन-तीन दिवसांनी जेव्हा
फोनवर सवड मिळते
गप्पात आपल्या या गं
रात्र सुध्दा न पुरते,
पण लाईट गेली मध्येच तर
तू लगेच मला म्हणते
मी नंतर फोन करते...!

प्रेमात मनाच्या
मन कधी न सावरते
तर सांग मला तू गं
झोपेत का बडबडते,
मग हळूच कुणी जागते
तू लगेच मला म्हणते,
मी नंतर फोन करते...!

गंध तुझ्या प्रेमाचा
नेहमीच दरवळत रहातो
दिसला जर कुणी का
तू लगेच मला म्हणते,
मी नंतर फोन करते...!



Scanned by TapScanner

# प्रेमाची नशा

जेव्हा तू गं सखे
बोलतेस मला
काय सांगू तुला
काय काय वाटे मला ।
पृथ्वीवर असून सुध्दा
स्वर्गातच वाटे मला
न आपले, न परके
न दगड, न धोंडे
रस्त्याचे काटे सुध्दा
आपलेच वाटे मला ।
बोलता बोलता जर
भेटली कुठे जागा मला
लोकांचे खिळपट सुध्दा
ताज ओबेराय वाटे मला ।
देशी संत्री वाले
रस्त्याच्या कडेला असतील
तर काय सांगू गं तुला
त्या प्रेमाची गं नशा
मी त्याचा राजा
आणि ते प्रधान वाटे मला ।

# प्रेमजीवन

जगतात का हे सारे
जीवन सगळेच हो न्यारे
सुंदर आहे जीवन
हे जगणारे हो न्यारे ।
कुणी करतील जीवनात
प्रेम.. प्रेम .. प्रेम..
कुणी जगतील प्रेमात
जीवन हो सारे ।
एक सल्ला म्हणून सांगतो
पडतील प्रेमात सारे
कुणी मरतील, कुणी धडपडतील
त्यात तुम्ही सावराल का रे
जीवन सगळे हो न्यारे
नक्कीच पडा तुम्ही
प्रेमात हो सारे
जर मारेल तुम्हाला
कुणी प्रेमामध्ये धक्का
त्याला आवराल का रे
जीवन हेच न्यारे ।
जगतो आहे
जीवन हे सारे
गंध तुझ्या प्रेमाचे
सोसून हे सारे ।

# खूप खूप बरं वाटायचं ..!

उन्हाळ्याच्या उन्हात ही
खूप खूप भटकायचं
घामाळलेल्या शरीराने
जीव कंटाळून जायाचं
तरी पण खूप बरं वाटायचं
जेव्हा 'तू आय मिस यू' म्हणायचं..
माणसाच्या गर्दीतही
चिडचिड वाटायचं..
घरटे पाखरांचे पाहात मी
शेतात पडायचं..
पण जगताना ही कधी कधी
जीवन नको नको वाटायचं
तेव्हा खूप बरं वाटायचं
जेव्हा तू 'आय मिस यू' म्हणायचं
रात्री सुध्दा आठवणीत
रात्रभर जागायचं
सकाळी पित्त उसळायचं
खूप खूप थकवा यायचं
तरी पण खूप बरं वाटायचं
जेव्हा तू 'आय मिस यू' म्हणायचं..



Scanned by TapScanner

# मनात तुझ्या

मनात ग सखे
तुझ्या काय ठसलयं
सांग ना गं मला
दुसरचं कोण बसलयं

या दूर दूर वाटा
आभाळ कुठं बसलयं
तुझ्यासाठी झुरणार मन
फक्त माझ्यातच बसलयं

किती वेळेस तर सांगून
बघ ओरडून बसलयं
माझे तुझ्यावर प्रेम म्हणून
सांगून गप्प बसलयं

एकदाचं गं मला
मोकळ व्हायचयं
ऐकून तुझ्या मनातलं
मला वेगळं व्हायचयं

# प्रेमभंग...

खरंच कळलयं मला
प्रेमभंग काय असतं ?
लेकराला आई नसते.
आईला लेकरू नसतं
वासराला गाय नसते
गाईला वासरू नसतं
प्रियकराला प्रेयसी नसते
प्रेयसीला प्रियकर नसतं
खरंच कळलयं मला
प्रेमभंग काय असतं ?
जुळलेले धागे प्रेमाचे
कधी जुळलेच नव्हते
हेच दाखवायचं असतं
पण आता कळलयं
प्रेमभंग काय असतं?
ती चालता चालता
बोलली होती मला,
ब्रेकअप झालयं त्याचं
काय सांगू तुम्हाला?
आता मला ती बोलली
यापुढं नाही बोलयचं मला
खरंच कळलयं मला
प्रेमभंग काय असतं?
शेवटी हे असंच असतं
गंध तुझ्या प्रेमाचा
फक्त दरवळत असतं.

## गंध तुझ्या प्रेमाचा

खूप-खूप हसायची
एकांत वेळी तर
खूप-खूप बोलायची
केव्हा केव्हा तर
भावनेच्या भरातही
खूप खूप रडायची
आपल्या या प्रेमाला
कुणाची तरी दृष्ट लागेल
असे सुध्दा म्हणायची
मी बोलते ना तुला
हे कुणालाच आवडत नाही
हे पण सांगायची
पण जेव्हा ती रागवयाची
दोन दिवस तरी
नाही शांत व्हायची

मी फोन केला तरी
नाही ऐकायचं तुझं मला
असंच म्हणायची
किती वेडी ना ती
रागात पण ही
मस्त वाटायची
गावी पण जाताना
एसएमएस करायची
मी घरी आहे
एवढंच सांगायची
बरेच दिवस झालेत
आता खूपच रूसलीय
म्हणून ही वेळ आहे गं
गंध तुझ्या प्रेमाची
आठवून आठवून जगण्याची

# इच्छा...

जीव माझा निघून जावा
तू पायथ्याशी असताना
स्वर्ग सुध्दा तेव्हाच मिळावा
तू स्वर्गात असताना !

पाऊल तुझा तेथे असावा
खड्डा माझा खोदताना
पदर तुझ्या साडीचा
देह माझा पुरताना !

झुरलो मी आयुष्यभर
तू भेटशील म्हणूनी
आशा नाही आता
माझी होशील म्हणूनी !

शेवटी हसून का होईना
एक तरी गोष्ट कर
देहाला तुझा पदर
एवढी तर इच्छा पूर्ण कर !



Scanned by TapScanner

# आयुष्याच्या वळणार

एक दिवस दिसली नाहीस
तर जिवाला खिन्नखिन्न वाटतं
तासाचं तर सोडूनच दे
जगणंच मला नको नकोसं वाटतं

पहाण्यासाठी तुझी एक अदा
मन खूप प्रसन्न असतं
घडलं नाही असं तर
मनालाच मेल्यासारखं वाटतं

डोळे माझे सखे तुझ्यासाठी
वाट वेड्यासारखी बघतात
मिळाले नाहीत नजारे तुझे तर
डोळेच नसल्यासारखे वाटतात

आयुष्याच्या वळणावर रोज मला
तू नक्कीच भेटणार वाटतं
भेटलीस नाहीस मला तर
जिवंत जाळल्यासारखं वाटतं

# झोप....

रात्री मला गं सखे
झोपच येत नाही
कारण एकही क्षण असा नाही
तुझी आठवण येत नाही
उगाचच संवाद आठवतो
मग विचार करतो
अखंड बुडून तुझ्यात
डोळ्यात पाणी दाटतो
विरहाने होतात मनी
वेदनाच जास्त
अशानेच लागते मग
साखर झोप मस्त
फोन करू वाटायचं
एसएमएस करू वाटायचं
दररोज रात्री तुला
खूप बोलू वाटायचं
मी अजुन तोच आहे
भावना ही तीच आहे
रात्र ही पूर्ण विचारात
शेवटी साखर झोपेत आहे.

# प्रीत...

माझ्या तू भावनेला
दिला नसता धक्का
दिसलो नसतो तुम्हाला
मी कवी आहे हो पक्का

प्रितीच्या या भावनेत
गुंतलो मी असा
दिसेल तो चेहरा
तुझाच हा कसा?

छंद हा कानाला
लागला तो कसा
तुझाच आवाज हवा
नाहीतर बोंबलत बसा?

सहवासात तुझ्या गं
वेगळीच नशा
विरहात तुझ्या मी
एकटाच कसा?

गंध तुझ्या प्रेमाचा
दिला गं कसा
आवरेल या भावनेला
दुसरा कुणी गं कसा?



Scanned by TapScanner

# फक्त तुझ्यामुळं....

जीवनात पुष्कळ दुःख आली
भयानक अशी संकटे आली
केवळ त्यांना आवरता आलं
फक्त तुझ्यामुळं

रागावर माझं नियंत्रण नाही,
माझ्या रागामूळे अनेकांना दुखावलं
पण कित्येकांना मला सावरता आलं
फक्त तुझ्यामुळं...

वीरांनी तलवारीनं एकेकाला कापलं
मी एका शब्दांत अनेकांना कापलं
केवळ उरलेल्यांना आयुष्यात जोडता आलं
फक्त तुझ्यामुळं...

जग फार निराळं आहे
कधीचं कुणाचं मला पटलं नाही
आता पण अनेकाची मन जिंकता आलं
फक्त तुझ्यामुळं...



Scanned by TapScanner

# पाऊस....

उगचं भटकायचं हाय
तुझ्या सोबत फिरायच हायं
रस्त्याने चालत का होईना
सोबत पावसात भिजायचं हाय

नदीकडं बसायचं हाय
गप्पा गोष्टी मारायचं हाय
डोक्यात फक्त एकच हाय
तुझ्या सोबत भिजायचं हाय

बरंच काम बाकी हाय
बसमध्ये बसायचं हाय
शाळेत मला जायचं हाय
तुझ्यासोबत भिजायचं हाय

जीवनात लय मजा हाय
पावसात परकही आपलचं हाय
कितीदा सांगितलं तुला
पावसात मला भिजायचं हाय



Scanned by TapScanner

# नाजूक कळी....

किती गं तू नाजक कळी
जास्त बोलू नको कुणाला
शब्द सुद्धा जड होतील
तुझ्या त्या नाजूक ओठांला..

इतकी सुंदर तू असताना
नाकामध्ये नथ कशाला
लवकर काढून टाक त्याला
उगचं जड तुझ्या नाकाला...

इतक्या लांब केसांना
इतकी फूलं कशाला
इतकी फूलं कशाला
तुझ्या त्या नाजूक केसांना
उगचच जड कशाला...



Scanned by TapScanner

# एकांत....

एकटाच बसून निवांत मी
आठवण तुझी करत असतो
तू सोबत नसतानाही
गप्पा मनाशीच मारत असतो

जेथे जेथे मी गेलो
आठवण फक्त तुझीच आली
तू सोबत नसतानाही
भास तू असल्याची झाली

असेच दिवस चाललेत
आयुष्य पण संपेल
जेव्हा तुझी आठवण येईल
तेव्हा डोळयात पाणी येईल

आता मी अजबच करू लागलो
आधी मी पाहायचो
फक्त झोपेतच स्वप्न
आता दिवसाही पाहू लागतो...



Scanned by TapScanner

# तडजोड...

भांडणात सुद्धा तिला
मी तडजोड करायला सांगायचं
माझे सुद्धा पटत नसताना
जुळवून घ्यायला सांगायचं
खूप सतावतात या
आठवणीच्या गोष्टी
किमान माझ्यासाठी
एवढंच कर म्हणायचं
छोट्या-छोट्या गोष्टीना सुद्धा
सॉरी-सॉरी म्हणायचं
वाटलचं जर कधी तर
सॉरी म्हणायला भाग पाडायचं
पण तडजोड करायचं
तडजोडीच्या जीवनात
तिला न कळत दुखवायचं
ती सारखं म्हणायचं
एकाच वेळेस का?
हजार वेळेस करायचं
पण तुला माफ करायचं
त्याच तुझ्या आठवणीत
गंधात तुझ्या प्रेमाच्या
दरवळत रहायचयं...दरवळत रहायचयं....

# दुःख....

बघ तुझ्या हृदयाला
त्रास झाला की तुला
सांग ना गं सखे
दुःख का या हृदयाला?

स्वयंपाक गं करताना
वेदना तुझ्या पायाला
सांग ना गं सखे
दुःख का या हृदयाला?

टोमॅटो चटणी करताना
तेल गं होत तव्याला
कांदा तू गं कापताना
पाणी का माझ्या डोळयाला?

पायी बघ चालताना
वेदना झाल्या गं तुला
मग सांग ना गं सखे
दुःख का या हृदयाला?



Scanned by TapScanner

# वेदना...

खरचं प्रेमात उफळतात
त्या भावना असतात
जर त्या आवडल्या नाहीत
खूप वेदना होतात,

भावना बिघडली तर
तिनं आवरायला पाहिजे
पण आवरलं नाही तर
तीच भावना वेदना बनते

नातं नाजूक असतं म्हणून
जास्त वेळेस खटकतं
बऱ्याचदा प्रेमात सुद्धा
बिचारं एकटंच लटकतं,

खरोखर टकूर सरकतं
जगणं सुद्धा नको वाटतं
आवडली नाही भावना तर
जीवन जगणं नको वाटतं



Scanned by TapScanner

## वाद...

ज्या दिवशी तुझा माझा
थोडा वाद झाला
चेहरा पांढरा झाला
जेवण थोडसं सपक झालं
दोन दिवसाचं उपवास झालं
तीन दिवस सारखचं
अंघोळ करायचं राहिलं
आई म्हणाली मला
बाहेरलं झालयं तुला
धागे दोरे चालू केलं
निव्वळ घरच्यांनी ताप केलं
महाराजांनी तर मला
तोंडावर पाणी मारून
खूपच परेशान केलं
कसं सांगू या सगळयांना
मला थोडसं वेगळंच झालं
नारळ डोक्यावर फिरवून
पांदीला टाकण्यात आलं
भाकर पायावर फिरवून
उकिरड्यात टाकण्यात आलं
आयुष्यात बघ असलं काही
पहिल्यांदाच झालं
डॉक्टरांनी सुद्धा चेक करून
टॅब्लेट इंजेक्शन दिलं...

# काळीज...

डोळयांना हा घाट आहे
आसवांना वाट आहे
चिरून बघ काळीज माझे
तुझी आठवणं दाट आहे

कधी जरी तुला
दुःख झाले आहे
अश्रू तर आलेच तेव्हा
काळीज ही फाटले आहे

तुझ्यासाठी कधी मी
डोक्याने विचार नाही केला
काळजासचं माहीत त्याने
काय काय वांधा केला

तुझ्या त्या प्रेमाची
आठवणं अजुन आहे
म्हणून माझं काळीज
रक्ताने माखून आहे.

# राग...

कुणी तुझ्याकडं बघायचा
तुझ्या विरूद्ध बोलायचा
अंगाला शहारा यायचा

कुणी तुझी चहाडी करायचा
टिंगल टवाळकी करायचा
इतका राग यायचा की,
तो मस्तकाला भिडायचा

मग मी हॉटेलवर जायचा
टेन्शन मध्ये चहा प्यायचा
रागात रागात जाऊन मग
रूमवर झोपायचा

तुझ्याकडे कुणी रोखून पहायचा
जीवाचा माझ्या तडफडा व्हायचा
थंडगार पाणी पिऊन मी तो
आतल्या आत दाबायचा

मित्र सोबत घ्यायचा
उगाचचं फेरफटका मारायचा
मनातील राग विसरावा म्हणून
तुझ्या स्वप्नात रमायचा



Scanned by TapScanner

# प्राण...

अजूनी जिवंत मी
आधीच आहे
तुझ्या प्रेमामध्ये गं
देह सुद्धा गेला आहे

असता घेतला मी
विषाचा सुद्धा प्याला
प्राण नाही गं शरीरात
तो केव्हाच निघून गेला

काळजावरती माझ्या
जखमा अनेक आहेत
जरी गेला कुजून देह
अजुनही धीर राहिला आहे

जगतो म्हणून मी
कसातरी जगत आहे
जखमी काळजावर दगड ठेवून
थोडासा पुढे चालत आहे.



Scanned by TapScanner

# स्वप्नं...

स्वप्नं हे स्वप्नंच असावं
पण कधीही न संपणार असावं,
स्वप्नात पाऊस पडावं
पण ऋतू हा ग्रीष्म असावं
आपण फक्त दोघचं असावं
तिसरं तिथं कुणीही नसावं
आनंदात आपण बहरावं
कळयासारखं उमलावं, फुलासारखं फुलावं
कधी फांद्यावर बसावं
कधी पाण्यात पोहावं
कधी तरी चंद्र बनावं
तिन चांदणी होऊनी लुकलुकावं
कधी वाटलंच तर आम्हाला
पक्षासारखं आभाळात उडावं
नाही घडले हे वास्तवात तर
किमान स्वप्नात तरी घडावं



Scanned by TapScanner

# कशी दिसावी ती?

अशी दिसावी ती
तशी दिसावी ती
सारेच विचारतात मला
कशी दिसावी ती?
माझ्या पेक्षा छोटीशी दिसावी
मी दिसल्या बरोबर
पटकन लाजावी

थोडीशी हट्टी असावी
चेहऱ्यात गोड असावी
दिसली जरा तर
दिवसा सुद्धा स्वप्ने पडावी

तुरू तुरू चालावी
फडाफड बोलावी
साडीवर सुद्धा ती
बाहुली सारखी दिसावी

खरंच एक तर
या जगात असावी
जेव्हा आयुष्य हे मिळेल तेव्हा
ती माझ्या नशीबात असावी

# राहिलेलं स्वप्न...

मला भेटायचं तुला
एकांतात बरंच बोलायचं तुला
असं काय झालं तुला
मनातून काढून टाकलं मला
खूप-खूप बोलायचं तुला
हसता-हसता मिठीत घ्यायचं तुला
असं कसं झाले गं सखे
जीवनातूनचं काढलस मला
खरंच मी खूप झुरायचो
अगं भेटण्यासाठी तुला
रस्ता पण चुकावायचो
मग तुला परेशान करायचो
एकदा माझी म्हणून
पहायचं होत तुला
हातात हात मिळवून
फिरवायचं होत तुला
तुझ्यासोबत जत्रेत जायचं होतं
पाळण्यात बसून फिरायचं होतं
कुणाची तरी लागली होती दृष्ट
म्हणून स्वप्न अधुरं राहिलं होतं

# दुभंगलेलं स्वप्न...

खरं नाहीतर नाही गं
खोटं-खोटं बोलत जा
भेटलीस कधी तरी
'आय लव्ह यू' म्हणत जा...

जीवनाच्या संगतीमध्ये
बघून-बघून खेळत जा
न आले लाजता तरी
चिडून का होईना जात जा..

तुझ्याकडे पाहातो मी
नजरेला नजर देत जा
मनातून नाही तर
उगीचच तर देत जा..

नाही जरी भेटलीस
फोनवर तरी बोलत जा
दुभंगलेल्या स्वप्नाला या
पूर्ण करून जात जा..

प्रेमामध्ये आहे गं मी
कधी कधी दिसत जा
गंध तुझ्या प्रेमाचा
थोडा-थोडा देत जा...



Scanned by TapScanner

# राहिलंय...

प्रेमात अजून बरेचसं
शिल्लक राहिलयं
तुझ्या त्या नाजूक ओठांवरती
ओठांना टेकवायचं राहिलं..
लाजतेस खूप म्हणूनी
हातावर हात ठेवायचं
अजूनी शिल्लक राहिलयं..
भेटीत तुझ्या त्या गं
स्पर्शून हृदयाला
भेटायचं अजुन राहिलयं..
हवेत जादू न्यारी
केसांच्या त्या गं लहरी
पाहायचं अजून राहिलयं...
असा कसा गं
हा निराळाच प्रेमवीर
तुझ्यासोबत अजुनी
जगायचं शिल्लक राहिलयं..
तू झोपेत ही खूप लाजशील
म्हणून दिवसाचे का होईना
मिठीत घ्यायचं राहिलयं...
गंध तुझ्या प्रेमाचा
अजूनही घ्यायचा राहिलयं...



Scanned by TapScanner

# प्रेमवेडा...

तुला बोलण्यासाठी
मी दिवाणा गं झालो
शब्द सुचवण्याच्या नादात
कविताच गं केलो..
प्रेम करताना तुझ्यावर
शब्दांवर पण केलो
तुझ्याच गं नादात
मी वाचक ही झालो...
काय सांगू आता
तुझ्याच आराधनेत
मी भक्त ही झालो
मंदिर मस्जिदीत रोज
प्रार्थना ही केलो...
न मागलो कधी
मजला काही
फक्त एकच केलो
जगावे तुझ्या सह म्हणूनी
उपवासही केला
गंध तुझ्या प्रेमाचा
घेतच राहिलो..घेतच राहिलो..



Scanned by TapScanner

# परत दे...

आठवणीत जगताना
होतात वेदना म्हणून
बहरलेलं जीवन
परत एकदा दे..
जगताना तू मला
बऱ्याचदा भेटतेस
मी नाही म्हणंत
तू माझ्याकडे ये
तुझ्या त्या ओठावरील
स्मित हास्य परत दे...
काय मागू?
नको-नको ते मागितले
आपले पणाची भावना
एकदा परत दे..
नसतात कुणाचे
हक्क गं कुणावर
आधी जेवढे माझे होते
तेवढे मला परत दे..
कित्येकदा भांडलोय आपण
कित्येकदा हसतोच आपण
आपले पणाची भावना
एकदा परत दे..
गंध तुझ्या प्रेमाचा
अजून थोडा दे.. अजून थोडा दे..



Scanned by TapScanner

# असे का घडावे...?

मी पायऱ्यावरून वर चढावे
तू हळूच आडवे व्हावे
सांग ना सखे असे का घडावे?
मला वाटावे तुला बघावे
तू आडवे लपावे

मी बोलताना सुद्धा
तू दुसऱ्यालाच बोलावे
सांग ना सखे असे का घडावे?
मी तुझ्याकडे पहावे
आणि तू दुसऱ्याकडेचं पहावे?

ओळीतल्या रांगेत
दोघे मागे पुढे बसावे
सांग ना सखे असे का घडावे?
मी तुझ्यावर मरावे
तुला काहीच न कळावे?

मी बघावे, तू लपावे
सांग ना सखे असे का घडावे?
न बोलताच दोघांनीही
लपाछपी का खेळावे?

# फक्त माझ्यासाठी...

बाईकवर आहेस
फिरायला निघालीस
वाटेत मैत्रिण भेटेल
तू तिथेच थांब
आणि तिथूनच मी
जात असेन
दिसताच क्षणी
गॉगल काढ
फक्त माझ्यासाठी..

बागेत गेलीस
आनंदात फिर
मी कुठेतरी
तिथेच असेन
केसाची पीन काढ
त्यांना मोकळे सोड
फक्त माझ्यासाठी...

बाजारात आलीस
माळ्याजवळ ये
काहीच विचार
करू नकोस
फक्त गुलाबाचेच फूल घे
आणि केसात लाव
फक्त माझ्यासाठी...

शाळा सुटेल
सरळ स्टॉपवर ये
मी तिथेच थांबलेला असेन
पर्समध्ये हात घाल,
मोबाईल काढ
कुणालातरी एक मिसकॉल कर
फक्त माझ्यासाठी...



Scanned by TapScanner

# बेभान मन...

झोपेत मी असताना
स्वप्नात पाऊस आला
बेभान झालेल्या मनाला
तुझी साथ देऊनी गेला

अशी आलीस तू गं
सुरूवात चुंबनाला
ओल्याचिंब शरीराने
श्वास ही गरम केला

थरथरते ते ओठ
धक-धक या काळजाला
भिडले हृदय हृदयाला
बेभान या मनाला

नभी अचानक
कडाडताच वीज
तू अशी बिलगली
रात्रभर चिकटली

बघुनी प्रेम आपुले
पाऊस बेभान झाला
पहाटेचा तो गारवा
देह ही थंड झाला

आवरू कसे मी गं
आता या विरहाला
बेभान या मनाला
त्या स्वप्नातल्या मिठीला

गंध तुझ्या प्रेमाचा
ही साथ जगण्याला
जगतो आहे मी गं
आठवून आठवणीला

# तुला पहायचं मला...

तुला पहायचं मला
शाळेत पर्स घेऊन जाताना
कुणीतरी मॅडम मॅडम म्हणताना

तुला पहायचं मला
कुठल्यातरी सम्मेलनात बोलताना
कुणीतरी प्रश्न विचारताना

तुला पाहायचं मला
त्या पन्नाशीच्या वयातही
डोळयांचा चष्मा काढून पुसताना

तुला पहायचं मला
आनंदात कोठेतरी फिरताना
उतार वयही असुनही निसर्गात भटकताना

तुला पहायचं मला
कुणीतरी आई म्हणताना
गालातल्या गालात हसताना

तुला पहायचं मला
कुणीतरी आजी म्हणताना
नातवा सोबत तू खेळताना

# पुढचा जन्म..

किमान असं तरी घडावं
मागच्या जन्मातील प्रेम
पुढच्या जन्मात तरी मिळावं

या जन्मात
तू ही रडली होतीस
पाहूनी माझी प्रीत
थंडगार पडली होतीस
हे बंध जाती जातीचे
पुढे एकत्र मिळावं
या जन्मातील प्रेम
पुढच्या जन्मात तरी मिळावं

माझ्या घराचा उंबरठा
आस धरून कसा
आता जरी नसले तरी
पुढच्या जन्मात तरी
तुझ्या पायाने ओलांडावं
या जन्मातील प्रेम
पुढच्या जन्मात तरी मिळावं

भीत-भीत भेटणं
पुढे हक्काचं व्हावं
सगळया रक्ताच्या नात्यांना
समाधान मिळावं
या जन्मातील प्रेम
पुढच्या जन्मात तरी मिळावं

हीच प्रार्थना ती
अर्पिती ईश्वर चरणी
गंध तुझ्या प्रेमाचा
पुढच्या जन्मी तरी मिळावा



कवीवर्य नबीसाब शेख



"'गंध तुझ्या प्रेमाचा' हा नबीसाब यांचा पहिला वहिला कविता संग्रह ! नव्याने लिहू लागलेल्या ग्रामीण भागातील युवकांच्या पिढीचे ते प्रतिनिधित्त्व करत आहेत. जळकोट सारख्या ग्रामीण भागातील नबीसाब सारखा तरुण शिक्षक समाजसेवी संघटनेच्या माध्यमातून विविध शैक्षणिक प्रकल्पांवर काम करण्यात व्यस्त असतानाही आपल्या प्रतिभा शक्तीने उत्तम साहित्य निर्मिती करत आहे ही मनाला सुखावणारी गोष्ट आहे.

'प्रेम' ही मानवी जीवनातील अतिशय पवित्र आणि नाजूक गोष्ट आहे. तरुणाईचा तो प्राण आहे. मनानं आणि शरीराने अगदीच तरुण असणाऱ्या नबीसाब यांच्याकडून उत्स्फूर्त युवा-युवतींच्या तरल मनांचे, प्रेमातूर आणि प्रेमाने ओतप्रोत न्हाऊन निघालेले तरुणाईचे अनुभव आपल्या विविध कवितांमधून अतिशय हळूवारपणे परंतु तितक्याच ताकदीने अभिव्यक्त झाले आहेत. त्यांच्या कवितांचा आस्वाद घेताना कमळाच्या पाकळ्यात मधूगंधासाठी गेलेला भ्रमर जसा अडकून पडतो तसा तरुण वाचक त्यांच्या कवितेत अडकून पडल्याशिवाय राहात नाही. प्रेमाच्या विविध छटा आणि रंग दाखवणारा हा कविता संग्रह सर्वच पातळीवर सरस उतरला आहे, यात शंका नाही. नबीसाब यांच्या हातून मराठी साहित्याची आणखी सेवा घडावी या अपेक्षेसह त्याच्या या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !"

अनुराधा प्रकाशन

भिमाशंकर बोळेगावे
चामरगा